# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

Dr. Shyam Khandare
Director
Ph. No. - 9765082096

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/NSS/ 1261 /2021

Dt: 13 / 07 /2021

प्रति

मा. प्राचार्य / रासेयो कार्यक्रम अधिकारी,
सर्व रासेयो महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय: राष्ट्रीय सेवा योजना सन २०२०—२०२१ च्या रासेयो अंतर्गत विद्यापीठ स्तरीय व राज्यस्तरीय पुरस्कारासाठी ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्याकरीता मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ:— १) रासेयो—२०२१ / (प्र.क्र. ६० / २१) / सशि—७ दिनाक १२.०७.२०२१
२) केंद्र शासनाचे पत्र क्र. DO NO. १२०१२ / १ / २०२१— NSS दि.१५.०६.२०२१
३)या कार्यासनाचे समक्रमाक दि. २९.६.२०२१ चे पत्र

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजना सन २०२०—२०२१ च्या रासेयो अंतर्गत विद्यापीठ स्तरीय व राज्यस्तरीय पुरस्कारासाठी ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्याकरीता रूपरेषा कळविण्यात आलेली होती. परंतु शासनाच्या वेब पोर्टलवरील सुविधेमध्ये झालेल्या तांत्रीक अडचणीमुळे लिंक सुरू होऊ शकली नाही. करीता रासेयो स्वंयसेवक नोंदणी प्रक्रिया व अर्ज भरण्याची सुविधा करिता संलग्नित पत्रात दिलेल्या सदर वेब पोर्टलवर सुचना दिल्याप्रमाणे नोंदणी करून संबंधितानी अर्ज भरण्याची कार्यवाही सुरू करावी. याकरीता रासेयो अंतर्गत विद्यापीठ स्तरीय व राज्यस्तरीय प्रस्तावाकरीता वरील संदर्भानुसार पुरस्कारासाठी ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्याकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे. करीता नोंद घ्यावी.

धन्यवाद!

(sd/- 13/07/2021)
डॉ. श्याम एस. खंडारे
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

संलग्न :— उपरोक्त प्रमाणे

महाराष्ट्र शासन
राष्ट्रीय सेवा योजना (मंत्रालय कक्ष), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई- ४०० ००१.
Email- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२- २२६७९५६५

क्रमांक: रासेयो-२०२१/( प्र. क्र.६०/२१) /साशि-७ दिनांक: १२.०७.२०२१.

प्रति,
कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना,
सर्व विद्यापीठे / संचालनालये

विषय:- राष्ट्रीय सेवा योजना सन २०२०-२१ या वर्षाचे
राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याबाबत...

संदर्भ:- १. केंद्र शासनाचे पत्र क्र. DO No.M-१२०१२/१/२०२१-NSS दि.१५.०६.२०२१
२. या कार्यासनाचे समक्रमांक दि. २९.०६.२०२१ चे पत्र

उपरोक्त विषयांकीत संदर्भ २ च्या पत्रान्वये सन २०२०-२०२१ या वर्षासाठीच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या पुरस्कारासाठी कार्यक्रम समन्वयक, कार्यक्रम अधिकारी, रासेयो स्वयंसेवक यांचे प्रस्ताव पाठविण्याबाबतची रुपरेषा कळविण्यात आली होती.

सदर ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्यासाठी https://nssmaharashtra.org.in या वेब पोर्टलवरील सुविधा काही तांत्रिक अडचणींमुळे सुरू होऊ शकली नाही. तथापि आज दि. १२.०७.२०२१ रोजी सायंकाळी https://nssmaharashtra.org.in या वेब पोर्टलवर रासेयो स्वयंसेवक नोंदणी प्रक्रिया व अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सबब सदर वेब पोर्टलवर खाली सूचना दिल्याप्रमाणे नोंदणी करून संबंधितांनी अर्ज भरण्याची कार्यवाही सुरू करावी.

याबाबतचे सुधारित वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | | सुरुवात दिनांक | अंतिम दिनांक | कार्यवाही स्तर |
|---|---|---|---|---|
| नोंदणी व प्रस्ताव सादर करणे | | | | |
| १ | स्वयंसेवक | १२.०७.२०२१ | १५.०७.२०२१ | |
| २ | कार्यक्रम अधिकारी | १२.०७.२०२१ | १५.०७.२०२१ | |
| ३ | कार्यक्रम समन्वयक | १२.०७.२०२१ | १५.०७.२०२१ | |
| प्रथम ऑनलाईन छाननी | | | | |
| १ | स्वयंसेवक | १३.०७.२०२१ | १६.०७.२०२१ | महाविद्यालयीन स्तरीय छाननी |
| २ | कार्यक्रम अधिकारी | १३.०७.२०२१ | १६.०७.२०२१ | विद्यापीठ स्तरीय छाननी |
| ३ | कार्यक्रम समन्वयक | १३.०७.२०२१ | १६.०६.२०२१ | शासन स्तरीय छाननी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम गुणवत्ता यादी प्रसिध्द | | | | |
| १ | स्वयंसेवक | | १६.०७.२०२१ | महाविद्यालयीन स्तरीय |
| २ | कार्यक्रम अधिकारी | | १६.०७.२०२१ | विद्यापीठ स्तरीय |
| द्वितीय छाननी | | | | |
| १ | स्वयंसेवक | १७.०७.२०२१ | | विद्यापीठ स्तरीय प्रत्यक्ष प्रस्ताव छाननी |
| २ | कार्यक्रम अधिकारी | १७.०७.२०२१ | | विद्यापीठ स्तरीय प्रत्यक्ष प्रस्ताव छाननी |
| दिनांक २२/०७/२०२१ पर्यंत संबंधित विद्यापीठे व संचालनालये यांनी राज्य शासनास विहित प्रस्ताव सादर करणे अनिवार्य. | | | | |
| अंतिम छाननी गुणवत्ता यादी प्रसिध्द | | | | |
| १ | स्वयंसेवक | | २३.०७.२०२१ | शासन स्तरीय |
| २ | कार्यक्रम अधिकारी | | २३.०७.२०२१ | शासन स्तरीय |
| ३ | कार्यक्रम समन्वयक | | २३.०७.२०२१ | शासन स्तरीय |

**सूचना :**

१. राज्य व राष्ट्रीय रासेयो पुरस्कारासाठी विद्यार्थी स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी यांच्या नोंदणीसाठी व पुरस्कार ऑनलाईन भरण्यासाठी सुरू झालेल्या https://nssmaharashtra.org.in या वेब पोर्टलवर आपल्या कार्यक्षेत्रातील ज्या कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखालील रासेयो एककाचे विद्यार्थी पुरस्कार प्रस्ताव भरण्यासाठी उत्सुक व वैध असतील त्यांची त्या कार्यक्रम अधिकाऱ्यांनीच सर्वप्रथम तात्काळ नोंदणी करून घ्यावी.

२. इतर विद्यार्थ्यांची नोंदणीही लागोपाठ करावी. त्यासाठी वेळ दिला जाईल.

३. परंतु विद्यार्थी स्वयंसेवकांनी आपल्या पुरस्काराचा प्रस्ताव online भरण्याअगोदर मागील परिपत्रकात जोडलेल्या इंग्रजी प्रस्तावात नमूद केलेल्या बाबींची यथास्थित व लागू पडणारी प्रमाणपत्रे, फोटो, पत्रव्यवहार अथवा इतर कागदपत्रे महाविद्यालय अथवा विद्यापीठ संकेतस्थळ याठिकाणी अपलोड असल्याची खात्री करणे आवश्यक आहे.

४. विद्यार्थी स्वयंसेवकांनी आपले महाविद्यालय व विद्यापीठ याद्वारे अशा संकेतस्थळ लिंकची तशी खात्री करूनच ऑनलाईन प्रस्ताव भरण्यास सुरुवात करावी, म्हणजे विचारलेल्या प्रत्येक ठिकाणी पुरावा म्हणून प्रत्यक्ष पुरावा अपलोड करणे अथवा त्याची लिंक अपलोड करणे शक्य होईल.

५. प्रत्यक्ष पुरावा अथवा त्याची लिंक पुरविल्याशिवाय कोणाचेही प्रस्ताव मान्य होणार नाहीत याची नोंद घ्यावी.

६. कार्यक्रम अधिकाऱ्यांनीही आपला स्वतःचा प्रस्ताव भरताना हीच प्रक्रिया व पद्धत अमलात आणावी.

७. ऑनलाईन प्रस्ताव भरण्यास केवळ ३ दिवसांचा कालावधी उपलब्ध आहे. त्यादृष्टीने विद्यापीठाने आपल्या कार्यक्षेत्रातील पुरस्कार प्रस्ताव दाखल करू इच्छिणाऱ्या विद्यार्थी स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकाऱ्यांना पुरावा सादर करण्यासाठीची लिंक तयार करण्यास तात्काळ मदत करणे अनिवार्य व क्रमप्राप्त आहे.

८. द्वितीय छाननीअंती शिफारस केले जाणारे प्रस्ताव सर्व संबंधितांच्या सही व शिक्क्यासह दि. २२.०७.२०२१ पर्यंत वा पूर्वी, मराठी व इंग्रजी हार्ड कॉपीमध्ये हस्तबटवड्याने शासनास सादर केले जातील, याची दक्षता घ्यावी.

९. रासेयो पुरस्कारासाठी शिफारस केल्या जाणाऱ्या प्रस्तावाची हार्ड कॉपी पाठविताना त्यासोबत संदर्भ क्र. १ अन्वये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नमूद केलेली चेकलीस्ट मराठी व इंग्रजीमध्ये प्रस्तावासोबत प्राप्त झाल्याशिवाय प्रस्ताव ग्राह्य धरले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

१०. Online माहिती भरताना काही अडचणी आल्यास Helpline ८१०४७२२७११ या क्रमांकावर संपर्क साधावा.

उपरोक्त सुधारित वेळापत्रकाचे कसोशीने व कालबद्ध पालन करणे आपल्या सर्वांसाठी बंधनकारक असल्याने, त्याप्रमाणे प्रस्ताव सादर करण्याबाबतची कार्यवाही करावी.

(डॉ. प्रभाकर ब. देसाई)
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी
महाराष्ट्र शासन.